IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# अधिष्ठान - सुदेश शरद लोटलिकर

**प्रा. प्राची जोशी**

**सहाय्यक प्राध्यापक धेंपे कला आणि विज्ञान महाविद्यालय मिरामार पणजी**

**मराठी संशोधक विद्यार्थी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (२०१८ ते आजतागायत. संशोधन केंद्र : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)**

**Email – prachigj8@gmail.com mob : 8999923473**

## प्रस्तावना :

**कविता म्हणजे काय? :** मराठी साहित्याच्या विविध वाड.मय प्रकारांपैकी एक महत्त्वाचा साहित्य प्रकार म्हणजे कविता. मराठी साहित्यातील कविता या साहित्य प्रकाराला प्रदीर्घ अशी परंपरा लाभली आहे. साहित्याच्या विविध प्रकारांपैकी कविता हा साहित्यप्रकार वेगळा ठरतो कारण कवितेचा शब्दावकाश जरी लहान असला तरी मोठा भावाशय त्यातून व्यक्त केला जातो. कवितेचे भाषिक माध्यम जरी लक्षात घेतले तरी शब्द आणि अर्थ यात असलेले गूढ नाते तसेच नाद,लय,प्रतिमा,रूपक,अलंकार,मिथ, सहचारी कल्पना इ. घटकाच्या ठिकाणी मुळातच असलेली एक तऱ्हेची प्रसारणशिलता, भारलेपण यातून भावाशयाला संपन्नता प्राप्त होते.

**विषयकेंद्री शब्द : कविता, भाव, गोमंतकीय, अध्यात्म, उपहास, उपरोध**

कवितेतून जन्माला आलेली भाषा ही केवळ कवितेचे मूलद्रव्य म्हणून केवळ कवितेपुरते मर्यादित न राहता जीवनाच्या सर्व व्यवहार क्षेत्रात पसरली आणि एक सांस्कृतिक व सार्वजनिक संस्था म्हणून विस्तारली हे जसे खरे तसेच या व्यवहारात भाषेमध्ये अनेक परींनी निर्माण झालेल्या विविध भाषिक घटकांच्या ठिकाणी काव्य या माध्यमातून व्यक्त होण्यासाठी अनावर ओढ असल्याचे दिसून येते. इंग्रजी साहित्यात दीर्घकथा असलेली नेरेटीव एपिक म्हणजेच काव्य अशी कल्पना दीर्घकाळापर्यंत रूढ होती व त्यामुळे त्यात स्फुट काव्य गुदमरून गेलेले आढळते. सुरवातीच्या काळात या स्फुट काव्याला कवितेच्या क्षेत्रात नगण्य स्थान होते. परंतु रोमॅंटिक युगाचा उदय होताच हे चित्र पालटले. भाव कविता हेच कवितेचे खरे-खुरे रूप होय ही जाणीव जनमानसात रुजू लागली आणि कवितेच्या मूळ प्रकृतीचा शोध सुरु झाला.कवितेचे खरे रूप समजायला हवे हीच

कवितेची मूळ प्रकृती. व या रूपाचे यशस्वी अनुकरण कोणाला करता येणार नाही हे तिचे वैशिष्टय. कारण कवितेची निर्मिती ही निसर्गदत्त कवित्व शक्ती लाभलेल्यालाच ही रचना करणे शक्य आहे.

सुदेश शरद लोटलीकर यांचा अधिष्ठान हा काव्यसंग्रह शरदपुष्प प्रकाशनने २०१२ साली प्रकाशित केला आहे. लोटलीकर इ गोमंतकीय मराठी कवितेच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचे कवीनाम. २०१० साली त्यांचा आत्मखुणा हा कविता संग्रह प्रकाशित झाला आणि त्यानंतर लगेच अधिष्ठान हा काव्य संग्रह प्रसिध्द झाला. लोटलीकर यांच्या प्रस्तुत काव्यसंग्रहात एकूण ८३ कवितांचा समावेश असून विषयांचे वैविध्य हे आत्मखुणा या काव्य संग्रहापेक्षा त्यांच्या या काव्यसंग्रहाचे वैशिष्टय.लोटलीकर यांच्या कवितांचा मूळ पिंड आध्यात्मिक स्वरूपाचा आहे व त्याचा प्रत्यय प्रस्तुत संग्रहातील कवितांमधूनही दिसून येतो उदा.

'मी तुकयाच्या विठ्ठलाची ओळ झालो, दिव्यांचे झाडं

या कवितेतील अद्वैतात न्हालो / व्यापमुक्त झालो अशी अभिव्यक्ती, अधिष्ठान ज्या कवितेचे शीर्षक प्रस्तुत संग्रहाला देण्यात आले आहे त्या कवितेतील

शोधून काढतो मी / माझा मला ही आत्मशोधाची प्रचीती,

देह या कवितेतील ' ही अभेद्य गढी / देहाची ह्या आत्म्यात शिरकाव करू देत नाही/

ध्यानातून वाट काढून आत शिरावे लागते यासारख्या त्यांच्या शब्दाभिव्यक्ती मधून त्यांच्या आध्यात्मिक ध्यासाची प्रचीती येते तर माझा मलाच पोरका सारख्या कवितेत निर्गुणात विलीन झाल्याचे दिसतात ते म्हणतात डोळ्यांना मी जो दिसतो आहे तो मी नव्हेच.

प्रस्तुत संग्रहातील उपरोक्त अशा काही कविता त्यांची मूळ प्रवृत्ती अभिव्यक्त करतात तर या संग्रहातील त्यांच्या काही कविता वास्तवाशी निगडीतही आहेत, राजकीय परिस्थितीचा वेध घेणाऱ्या आहेत उदा. प्रस्तुत संग्रहातील त्यांच्या 'भारत' या कवितेत देशाची सध्याची दुरावस्था शब्दबद्ध केली आहे. भूक, अभाव, नागडेपण वगैरे चा उल्लेख करून कै कडव्या आणि कडवट भाषेत लिहितो

'रांडांचा बाजार मांडला

दारू वाहते नसानसतून

भारत माझा सडतो आहे

भटक्यांना खांद्यांवर घेऊन.'[1]

या कवितेतून प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुद्धची चीड, संताप अगदी जिवंतपणे व्यक्त झाल्याचे दिसून येते तर त्यांच्या ‘ नोटीवरचा गांधीजी म्हणतो’ या कवितेत नाराजीही आहे आणि उपहासगर्भाताही आहे. नोटांवर गांधीजीचे छायाचित्र छापून त्या विलोभनीय हसऱ्या महात्म्यासमोर आपले मंत्री भ्रष्टाचार करतात, खाबुगिरी करतात, निर्लज्जपणाचा कळस करतात, त्या महात्म्याच्या साक्षीने जुगार चालतात, व्यभिचार चालतात, सगळ्या प्रकारचे अनैतिक धंदे चालतात आणि गांधी म्हणतो

 नोटीवरचा गांधी म्हणतो

नेसी मजला कुठे पामरा. [2]

लोकशाही, देव झोपला क्षणभर काही’ या सारख्या त्यांच्या कविता अशाच वळणाच्या आहेत. त्यांच्या प्रस्तुत संग्रहातील कवितेतून सामाजिक भान मोठया प्रमाणात व्यक्त झाल्याचे दिसते व ते होत असताना वास्तवाविषयी नाराजी व राग हा कवी प्रकट करतो. ‘जगायचं ते त्यांच्यासारखच, तो, त्यांच्यासाठी’ अशा काही कविता याची साक्ष देतात. त्यात धनवंतांच्या पार्श्वभूमीवर गरिबांचे, त्यांच्या कष्टांचे कौतुक गायले आहे उदा.

‘त्याला वाचायला येत नाही

मला माडावर चढता येत नाही

तो हाफ चड्डीत छान दिसतो

मी माझा दोंद लपवतो

कष्टाचे सगळे फायदे त्याला मिळणार

श्रीमंतीचे सारे रोग मला जडणार [3]

अशा शब्दांतून ते कष्टकरी व्यक्तीप्रती असणारा आपला प्रामाणिक भाव व्यक्त करतात.

प्रस्तुत संग्रहातील त्यांच्या वैशिट्यपूर्ण कविता म्हणजे व्यक्तीचित्रणात्मक कविता. त्यांच्या या कविता इतर कवितांच्या तुलनेत अधिक सरस आणि समर्थ ठरल्या आहेत. उदा. नरेंद्र बोडके यांच्यावर लिहिलेली त्यांची कविता मुळातून वाचण्यासारखी आहे. या कवितेत

‘वाघासारखा दाताने तंगडी कबाब तोडणारा तो’ अशी बोडके यांची दणकट अवस्था सांगून नंतर त्यांना झालेले बिकट आजार, त्यांचे डायलेसिसवर केविलवाणे जगणे, वयाच्या ५२व्या वर्षी अधू होणे व अपंगत्व येणे, त्यांची मरणासन्न झालेली ही अवस्था लोटलीकर यांनी अतिशय जिवंतपणे

शब्दबद्ध केली आहे व त्यांच्याच जीवनावर आधारित बोडके यांच्या मृत्यूनंतर लिहिलेली कविताही तितकीच हृदयस्पर्शी आहे या कवितेत ते म्हणतात

'परममित्र होतास तू माझा

सखा होतास तू

बाप होतास माझ्या कवितांचा

गुरु होतास तू

असा सुरवातीला लोटलीकरांच्या जीवनातील बोडकेचे महत्त्व विषद करून कवितेच्या शेवटी ते म्हणतात

आपण ऐकवायचो फोनवरून एकमेकांना कविता

सवयीप्रमाणे तुझ्यावरची ही नवीन कविता

तुला वाचून दाखवायला

माझा हात फोनच्या दिशेने गेला

आणि.........[4]

आई हा लोटलीकर यांच्या व्यक्तिमत्वाचा हळवा कोपरा. 'आई असायची' ही या संग्रहातील त्यांची कविता आशयघन आहे. आई सर्वत्र आणि सर्व परीस्थित सोबत असायची, सुखात, दुख्खात, आजारात, ताणतणावात सर्वत्र आई असायची याचे वर्णन त्यांच्या कवितेत खालीलप्रमाणे येते

'आई असायची

सर्वत्र विखुरलेली

सवयच नव्हती

आई नसायची'. [5]

आई प्रमाणेच त्यांच्या आजीवरही त्यांनी लिहिलेली कविता आस्वाद्य आहे. ९५ वर्षांचे त्यांचे प्रेमळ व्यक्तिमत्व. त्यांच्या आजीने म्हणजेच माईने त्यांच्या आयुष्यात अनेक थोर व्यक्ती पहिल्या होत्या, अनेक अविस्मरणीय प्रसंग अनुभवले, अनेक ग्रंथांचे वाचन केले अशी एखाद्या समृध्द वृक्षासारखी

त्यांची आजी. तिने दुधसायीने कुरवाळलेले कवीचे बालपण ह्या कवितेत आपल्या आजीप्रतीचे त्यांच्या मनातील प्रेमभाव व्यक्त करताना कवितेच्या शेवटी हा कवी म्हणतो

‘ माई, आम्ही तुला

काही तरी देऊ लागतो

ही कविताच म्हण ना

फक्त तुझ्यासाठी !

तुझ्या थरथरणाऱ्या आणि सुरकुतलेल्या

सर्व समावेशक

तेजोमय चेहऱ्याला स्मरून ![6]

कवी ग्रेस, कबीर याही त्यांच्या प्रस्तुत काव्यसंग्रहातील कविता व्यक्तीचित्रणात्मक कविता लक्षणीय आहेत त्यातीलच एक म्हणजे त्यांची स्वतः बद्दल व्यक्त झालेली मी : सुदेश लोटलीकर! ही कविता. आपल्या घरच्यांच्या आपल्याकडून असणाऱ्या अपेक्षा, मी डॉक्टर व्हावे, इंजिनियर व्हावे किंवा आर्किटेक्ट व्हावे नाहीच जमले तर निदान प्राध्यापक व्हावे असे सर्वांना वाटत होते पण मी त्यांची कुठलीच अपेक्षा पूर्ण करू शकलो नाही. मी झालो फक्त कवी ! म्हटले तर ही कवीच्या काळजात उमटलेली कळ आहे किंवा अभिमान आहे.

**निष्कर्ष:**

अगदी खरे सांगायचे झाल्यास प्रस्तुत संग्रहातील त्यांच्या सर्वच कविता मला अतिशय भावल्या. त्या सर्वांचा परामर्श इथे घेणे शक्य नाही पण या संग्रहातील मृत्यूसंदर्भातील कविता, प्रतीकात्मक आशयाच्या कविता, नवकवितेला विरोधी कविता, शरीरप्रेम व शृंगाराचे उघडपणे वर्णन करणाऱ्या कविता अतिशय प्रभावीपणे जिवंतपणे त्यांनी शब्दबद्ध केल्या आहेत. त्यांच्या या संग्रहातील कविता अतिशय साध्या सोप्या भाषेतील असून कोणत्याही रसिक मनाला भुरळ घातल्याशिवाय त्या राहत नाहीत.

संदर्भसूची


१. लोटलीकर सुदेश, ‘अधिष्ठान’ शरदपुष्प प्रकाशन २०१२

२. तैत्रव पृ.१०

३. तैत्रव पृ.२४

४. तैत्रव पृ.३०

५. तैत्रव पृ.६५

६. तैत्रव पृ.७०

International Research Journal
IJNRD
Research Through Innovation